समादेशक,
भा.रा.ब.- ३, कोल्हापूर.

समादेशक,
भारत राखीव बटालियन-३, कोल्हापूर.
दुरध्वनी व फॅक्सक्रमांक ०२३१/२६५३४६६
ईमेल :- comdt.irb३.kop@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जावक क्र.:- भाराब-३/आस्था-१/पो.भरती २१/लेखी परीक्षा सुचना/२०२३/ 292 कोल्हापुर,दिनांक 19 JUL 2023 /०७/२०२३.

## सशस्त्र पोलीस शिपाई भरती - २०२१

## -: लेखी परीक्षेकरीता पात्र उमेदवारकरीता सुचना :-

१. या आस्थापनेवरील सशस्त्र पोलीस शिपायांची ७३ रिक्त पदे भरणेकरीता लेखी परीक्षेकरीता एकुण १४०८ उमेदवार पात्र झाले असुन पात्र उमेदवारांची यादी संकेतस्थळावर पोलीस www.maharashtrasrpf.gov.in व www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १४.०३.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. सशस्त्र पोलीस शिपाई भरती २०२१ लेखी परीक्षा दिनांक २३.०७.२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता विवेकानंद कॉलेज, ताराबाई पार्क,कोल्हापूर व न्यु मॉडेल इंग्लिश स्कूल ज्युनिअर कॉलेज, ताराबाई पार्क, कोल्हापूर येथे घेण्यात येणार असुन त्याबाबतचे प्रवेशपत्र महाआयटी कंपनीकडुन वाटप करण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर बायोमॅट्रिक्स करीता सकाळी ०८.०० वाजता उपस्थित राहणे अनिवार्य आहे.तसेच उशिरा आलेल्या उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत प्रवेश दिला जाणार नाही.

३. उमेदवारांना मैदानी चाचणीवेळी वाटप करण्यात आलेले प्रवेशपत्र लेखी परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे, अन्यथा परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

४. परीक्षा केंद्राच्या आवारात मित्र,नातेवाईक, पालक व अन्य अनधिकृत व्यक्तीस प्रवेश अनुज्ञेय नाही.तसेच मौल्यवान वस्तुची जबाबदारी संबधित उमेदवाराची राहील.

५. पडताळणी व तपासणी संदर्भातील कार्यवाही पुर्ण झालेनंतर उमेदवार निश्चित केलेल्या बैठक क्रमांकावर जाईल.

६. ओळखीच्या पुराव्याबाबत - परीक्षेच्या वेळी ओळख पुराव्यासाठी आधार कार्ड, निवडणुक आयोगाचे ओळखपत्र,पासपोर्ट, पॅनकार्ड, वाहन परवाना, महाविदयालय ओळखपत्र या पैकी किमान एक ओखळपत्र सोबत असणे आवश्यक आहे.

७. परीक्षा केंद्रावर एकदा प्रवेश केल्यानंतर परीक्षा संपेपर्यत कोणत्याही परिस्थितीत बाहेर जाण्यास सक्त मनाई राहील.

८. मोबाईल फोन,मायक्रोफोन,ब्लु टुथ,स्मार्ट वॉच, डिजीटल गॅझेट,कॅलक्युलेटर,इलेक्ट्रीक उपकरणे तसेच दुरसंचार साधने इ. परीक्षा केंद्राच्या परीसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वत:जवळ बाळगण्यास वापर करण्यास, इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे.

९. परीक्षा केंद्रामध्ये कोणत्याही अनुचित प्रकार घडु नये, याकरीता सर्व परीक्षा केंद्रावर वर्गनिहाय सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आलेले असुन ओळख पटविणेकरीता बायोमेट्रिक हजेरी घेण्यात येणार असल्याने तोतया/डमी उमेदवार आढळुन आल्यास तसेच परीक्षा दरम्यान गैरवर्तन केल्यास उमेदवारांस परीक्षेकरीता अपात्र ठरवुन योग्य ती कायदेशिर कारवाई करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

१०. **परीक्षा केंद्रात बंदी घालण्यात आलेले कोणतेही साहित्य घेवुन येण्यास, इलेक्ट्रॉनिक साहित्य वापरण्यास,परीक्षा कक्षातील माहिती बाहेर जाईल, तसेच परीक्षा कक्षाबाहेर संपर्क होईल असे साहित्य वापरल्यास उमेदवारांस अपात्र करण्यात येईल, व त्यांचेवर कडक कायदेशिर कारवाई करण्यात येईल.**

**( संदिप ग. दिवाण )**
समादेशक,
भारत राखीव बटालियन-३,कोल्हापुर.